**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग जळगांव यांचे न्यायालयात**

MHJG060063102026

**संक्षिप्त खटला क्र. ४३१५/२०२६**
**सरकार वि. जाकीर खान रफीक खान**
**नि.क्र.०४**

**<u>न्यायनिर्णय</u>**

**०१.** आज रोजी आरोपी यास **श्री. दिपक पाटील, हे. कॉ. ब. नं.२५१ आर.पी.एफ.पोलीस स्टेशन जळगांव** यांनी हजर केले आहे. आरोपीने न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यास खाजगी वकील लावणे नसल्याचे कथन केले आहे. सबब, सदर आरोपीस जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जळगांव यांचेकडील विनामुल्य वकील मिळत असल्याबाबत सुचित करण्यात आले असता सदर आरोपी सांगतो की, त्यास विनामुल्य वकील पाहिजे नाही. सदर आरोपीस त्याच्या गुन्ह्याचा तपशील व त्यावर होणारी शिक्षा व दंड समजावुन सांगण्यात आला असता, सदर आरोपी प्रतिकथन करतो की, त्यास गुन्हा स्वइच्छेने कबुल आहे व त्याचा सदरचा पहिला गुन्हा असून असा गुन्हा पुन्हा त्याच्या हातून घडणार नाही हे सांगितले आणि शेवटी तो घरातील एकमेव कमविता असल्याने व त्याची आर्थिक परिस्थिती ही गरीबीची असल्याने कमीत कमी दंड आकारण्याची विनंती केली. आरोपीने आपले गुन्हा कबुल असल्याची **पुरसिस नि.क्र.०२** वर दिली असुन **नि.क्र.०३** प्रमाणे आपले **आधारकार्डाची प्रमाणीत** प्रत या न्यायालयाचे सहाय्यक अधिक्षक यांचे सही निशी दिली आहे.

**०२.** आरोपीचे प्रतिकथन आणि गुन्ह्याचे स्वरुपाचा व आरोपीच्या विनंतीचा विचार करता, तसेच आरोपीने स्वइच्छेने गुन्हा कबुल केला आहे. तसेच सदर गुन्हयाची कबुली नंतरचे परिणाम या न्यायालयाने त्यास समजावुन सांगितला, परंतु तो स्वतःहुन गुन्हा कबुलीच्या निर्णयास ठाम राहिल्यामुळे त्याची कबुली मान्य करण्यात आली आहे. यावरुन मी असे निर्णय करीत आहे की, आरोपीने **भारतीय रेल्वे कायदा कलम १४४, १४७** प्रमाणे गुन्हा केला आहे.

**०३.** आरोपी व सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीस शिक्षेबद्दल विचारणेत आले. त्याने सदरचा गुन्हा कबुल केला व कमीत कमी द्रव्य दंड देण्यात यावा अशी विनंती केली. सदर आरोपीचे कथन समाधानकारक असल्यामुळे, त्याने केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप व आर्थिक परिस्थिती पाहता या न्यायालयाचे मत आहे की, न्यायाच्या हितासाठी आरोपीला कमीत कमी शिक्षा करणे न्यायसंगत व योग्य होईल. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

**<u>आदेश</u>**

**१.** आरोपीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये **भारतीय रेल्वे कायदा कलम १४४** खाली दोषी धरणेत येऊन **रक्कम १०००/–(अक्षरी रुपये एक हजार मात्र)** दंड ठोठावण्यात येत आहे, दंड न भरल्यास आरोपीने ०३ दिवसाचा साधा कारावास सोसावयाचा आहे.

**२.** आरोपीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये **भारतीय रेल्वे कायदा कलम १४७** खाली दोषी धरणेत येऊन **रक्कम २५०/–(अक्षरी रुपये दोनशे पन्नास मात्र)** दंड ठोठावण्यात येत आहे, दंड न भरल्यास आरोपीने ०१ दिवसाचा साधा कारावास सोसावयाचा आहे.

SUREKHA VIJAY MORE Digitally signed by SUREKHA VIJAY MORE Date: 2026.08.14 16:21:34 +0530

**(श्रीमती एस.व्ही.मोरे)**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,जळगांव

दिनांक : १४/०८/२०२६.